महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा मुख्य परीक्षा - २०२१ मधील सहायक कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावरील पदस्थापनेबाबत.

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्रमांक-नियुक्ती-२०२३/प्र.क्र.८६/आ (संनि)

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- २८ फेब्रुवारी, २०२५

शासन निर्णय

महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांच्या क्रमांक : ३७४ (२)/स्थापत्य/२०२१/१९, दि.०५.०७.२०२३ च्या पत्रान्वये महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा मुख्य परीक्षा-२०२१ च्या अंतिम निकालाच्या आधारे सहायक कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदासाठी २० उमेदवारांची नियुक्तीसाठी शासनास शिफारस केली होती. त्यानुषंगाने सदरहू शिफारशीस अनुसरुन कागदपत्रांची पूर्तता केलेल्या सर्व उमेदवारांना सहायक कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर समक्रमांक दि.३१.०१.२०२४ च्या शासन निर्णयान्वये दोन वर्षाच्या परिवीक्षाधीन कालावधीसाठी तात्पुरती नियुक्ती देण्यात आली आहे.

तथापि, नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांपैकी ०१ उमेदवार हे मेटा नाशिक येथे रुजू झाले नसल्याने सदर ०१ उमेदवारांची नियुक्ती दि. २७.११.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आली आहे.

२. उपरोक्त नमूद दि.३१.०१.२०२४ च्या शासन निर्णयान्वये मेटा, नाशिक येथे सहायक कार्यकारी अभियंता (स्थापत्य)या संवर्गात एकूण १९ उमेदवार दिनांक ०१.०३.२०२४ रोजी प्रशिक्षणासाठी रुजू झाले आहेत. सदरहू उमेदवारांचा एक वर्षाचा प्रशिक्षण कालावधी दि.२८.०२.२०२५ रोजी संपुष्टात येत आहे.

३. सदरहू उमेदवारांना दि. ०१.०३.२०२५ पासून महसूल विभाग वाटप नियम, २०२१ नुसार त्यांची पदस्थापना करणे आवश्यक आहे. महसूल विभाग वाटप नियम, २०२१ मधील तरतुदीनुसार शासन निर्णय दि.३१.०१.२०२४ अन्वये मेटा, नाशिक येथे प्रशिक्षणासाठी हजर झालेल्या १९ उमेदवारांना सहायक कार्यकारी अभियंता (स्थापत्य), गट-अ या पदासाठी महसूल विभाग वाटप व सविस्तर पदस्थापना **"परिशिष्ट-अ"** मध्ये दर्शविण्यात येत असून त्यांच्या पदस्थापनेत कोणताही बदल होणार नाही.

४. सहायक कार्यकारी अभियंता (स्थापत्य), गट-अ या पदावर महसूल विभाग वाटप झालेले उमेदवार ज्या दिवशी मेटा, नाशिक येथे प्रशिक्षणासाठी हजर झालेले आहेत तो दिनांक त्यांचा पदस्थापनेचा दिनांक समजण्यात यावा.

५. शासन निर्णय दिनांक ३१.०१.२०२४ च्या परि.३ (१३) मध्ये नमूद केल्यानुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता उर्वरित मागास प्रवर्गातील उमेदवारांचे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे/ आर्थिक दुर्बल घटक प्रमाणपत्र संबंधित समितीकडून पडताळणीच्या अधीन राहून संबंधित उमेदवारांना सहायक कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर तात्पुरती नियुक्ती देण्यात आली आहे. त्यानुषंगाने गुणवत्ता क्र. ४, ७, ८, ९, १० व २० या उमेदवारांची सहायक कार्यकारी अभियंता (स्था) या पदावरील तात्पुरती पदस्थापना त्यांचे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे / आर्थिक दुर्बल घटक प्रमाणपत्र सक्षम प्राधिकरणाकडून पडताळणी होवून प्राप्त होणाऱ्या

अहवालाच्या अधीन राहून देण्यात येत आहे. उर्वरीत उमेदवारांचे पडताळणी अहवाल शासनास प्राप्त झाले आहेत. यास्तव सदर सशर्त अट वगळण्यात येत आहे.

६. शासन निर्णय समक्रमांक दिनांक ३१.०१.२०२४ मधील नियुक्ती संदर्भातील अन्य सर्व अटी व शर्ती कायम राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०२२८१७३५२९७६२७ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANIL VITTHAL DEOKATE

Digitally signed by ANIL VITTHAL DEOKATE
DN: CN = ANIL VITTHAL DEOKATE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = WATER RESOURCES DEPARTMENT
Date: 2025.02.28 17:38:53 +05'30'

(अनिल देवकाते)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

परिशिष्ट अ मधील उमेदवार (ईमेलद्वारे)

प्रत :-

१) अ.मु.स. (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४) सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
५) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग. (पत्राने)
६) महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण व संशोधन, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक.
७) मा.मंत्री, जलसंपदा (गोदावरी आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांचे खाजगी सचिव.
८) मा.मंत्री, जलसंपदा (विदर्भ, तापी व कोंकण विकास महामंडळ) यांचे खाजगी सचिव.
९) महालेखापाल-१/२, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
१०) महालेखापाल-१/२, लेखा परीक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
११) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२) सर्व मुख्य अभियंता (स्था), जलसंपदा विभाग.
१३) उप सचिव (सेवा)/(प्रशासन), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) अधीक्षक अभियंता व सह संचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक.
१५) कक्ष अधिकारी, कार्यासन आ(वर्ग-१)/आ(वर्ग-२)/आ(प्रशिक्षण)/गोपनीय/नोंदणी शाखा, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१६) संग्रहार्थ/ कार्यासन आ (संनि)

शासन निर्णय क्रमांक : नियुक्ती-२०२३/प्र.क्र.८६/आ(संनि), दिनांक २८ फेब्रुवारी, २०२५ सोबतचे परिशिष्ट

परिशिष्ट-अ

अ. क्र	म.लो.आ.ने शिफारस केलेला गुणवत्ता क्रमांक	सहायक कार्यकारी अभियंता (स्थापत्य), गट-अ यांचे नाव	पसंती दिलेला महसूल विभाग	सूट दिलेल्या प्रकरणी महसूल विभाग वाटप	नियमा नुसार महसूल विभाग वाटप	सविस्तर पदस्थापना
१	१/२०२१	श्री. गावकर धनंजय प्रकाश	पुणे	--	पुणे	मुख्य अभियंता (जसं.), जलसंपदा विभाग, पुणे अंतर्गत अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे अंतर्गत कार्यकारी अभियंता, चासकमान पाटबंधारे विभाग,पुणे अंतर्गत चासकमान पाटबंधारे उपविभाग क्र.४, शिरुर येथील रिक्त पदी.
२	२/२०२१	श्री. प्रज्वल प्रदीप महाजन	पुणे	--	पुणे	मुख्य अभियंता (जसं.), जलसंपदा विभाग, पुणे अंतर्गत अधीक्षक अभियंता, सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली अंतर्गत कार्यकारी अभियंता, टेंभू उपसा सिंचन प्रकल्प व्यवस्थापन विभाग, ओगलेवाडी अंतर्गत टेंभू उपसा सिंचन प्रकल्प व्यवस्थापन उपविभाग, तासगांव येथील रिक्त पदी.
३	३/२०२१	श्री. पाटील प्रविण सुधीर	पुणे	--	पुणे	मुख्य अभियंता(वि.प्र.),जलसंपदा विभाग,पुणे अंतर्गत अधीक्षक अभियंता, कुकडी सिंचन मंडळ,पुणे अंतर्गत कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.२, श्रीगोंदा, अंतर्गत कुकडी पाटबंधारे उपविभाग, करमाळा येथील रिक्त पदी.
४	४/२०२१	श्री.झावरे शैलेश गोरक्षनाथ	नाशिक	--	नाशिक	मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव अंतर्गत अधीक्षक अभियंता, जळगांव पाटबंधारे प्रकल्प मंडळ, जळगांव अंतर्गत कार्यकारी अभियंता, उपसा सिचंन बांधकाम विभाग, जळगांव अंतर्गत वरणगांव तळवेल उपसा सिंचन बांधकाम उपविभाग,क्र.२ काहुरखेडा येथील रिक्त पदी.
५	५/२०२१	श्रीम. खुर्द अदिती विरुपाक्ष	पुणे	--	पुणे	मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे अंतर्गत अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, पुणे अंतर्गत कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण विभाग, पुणे (भिमा उपखोरे) अंतर्गत पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण उपविभाग क्र.२, स्वारगेट येथील रिक्त पदी.
६	६/२०२१	श्री.विश्वेकर शैलेश रामलिंग	छ.संभाजीनगर	--	छ.संभाजीनगर	मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग,छत्रपती संभाजीनगर अंतर्गत अधीक्षक अभियंता, धाराशिव पाटबंधारे मंडळ, धाराशिव अंतर्गत कार्यकारी अभियंता, धाराशिव लघु पाटबंधारे विभाग, धाराशिव अंतर्गत लघु पाटबंधारे उपविभाग, कळंब येथील रिक्त पदी.

७	७/२०२१	श्री.धामणे ऋषिकेश रावसाहेब	नाशिक	--	नाशिक	मुख्य अभियंता, जलविद्युत प्रकल्प व गुण नियंत्रण, पुणे अंतर्गत अधीक्षक अभियंता, गुण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर अंतर्गत कार्यकारी अभियंता, गुण नियंत्रण विभाग, धुळे अंतर्गत गुण नियंत्रण उपविभाग, संगमनेर येथील रिक्त पदी.
८	८/२०२१	श्री.पवार विक्रम मिनानाथ	नाशिक	--	नाशिक	मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव अंतर्गत अधीक्षक अभियंता, धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे अंतर्गत कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, धुळे अंतर्गत लघु पाटबंधारे बांधकाम उपविभाग, धुळे येथील रिक्त पदी.
९	९/२०२१	श्री.आहिरे यश सुनिल	अमरावती	--	अमरावती	मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती अंतर्गत अधीक्षक अभियंता, यवतमाळ सिंचन मंडळ, यवतमाळ अंतर्गत कार्यकारी अभियंता, बेंबळा प्रकल्प विभाग, यवतमाळ अंतर्गत बेंबळा प्रकल्प उपविभाग क्र.१, थाळेगाव येथील रिक्त पदी.
१०	१०/२०२१	श्री. विंचु योगेश्वर अशोक	नाशिक	--	नाशिक	मुख्य अभियंता, जलविज्ञान व धरण सुरक्षितता, नाशिक अंतर्गत अधीक्षक अभियंता, आधार सामग्री पृथ:करण मंडळ, नाशिक अंतर्गत संशोधन अधिकारी, जलगती संशोधन विभाग क्र.१,नाशिक येथील रिक्त पदी.
११	११/२०२१	श्री. दातीर विनित महेंद्र	अमरावती	--	अमरावती	मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती अंतर्गत अधीक्षक अभियंता, जिगांव प्रकल्प पाटबंधारे मंडळ, शेगांव अंतर्गत कार्यकारी अभियंता, जिगांव प्रकल्प पुनर्वसन विभाग, खामगांव अंतर्गत जिगांव पुनर्वसन उपविभाग, मलकापुर येथील रिक्त पदी.
१२	१२/२०२१	श्रीम. पाटील आरती महावीर	कोंकण-१	--	कोंकण-१	मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, मुंबई अंतर्गत अधीक्षक अभियंता, दक्षिण कोंकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, ओरोस-सिंधुदुर्गनगरी अंतर्गत कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभागीय पथक, आंबडपाल येथील रिक्त पदी.
१३	१३/२०२१	श्री.अघम सृजन नरेश	नागपूर	--	नागपूर	मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर अंतर्गत अधीक्षक अभियंता, पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण मंडळ, नागपूर अंतर्गत कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण विभाग, चंद्रपूर अंतर्गत पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण उपविभाग, आलापल्ली, (मु. चंद्रपूर) येथील रिक्त पदी.
१४	१५/२०२१	श्री.कोकरे सागर ज्ञानदेव	छ.संभाजीनगर	--	छ.संभाजीनगर	मुख्य अभियंता(वि.प्र.),जलसंपदा विभाग,पुणे अंतर्गत अधीक्षक अभियंता, धाराशिव पाटबंधारे मंडळ,धाराशिव अंतर्गत कार्यकारी अभियंता, धाराशिव मध्यम प्रकल्प विभाग, धाराशिव अंतर्गत लघु पाटबंधारे उपविभाग, आष्टी येथील रिक्त पदी.

१५	१६/२०२१	श्रीम.बारई अर्पिता किसन	छ.संभाजीनगर	--	छ.संभाजीनगर	मुख्य लेखा परिक्षक, जल व सिंचन, महाराष्ट्र राज्य, छत्रपती संभाजीनगर कार्यालयांतर्गत रिक्त पदी.
१६	१७/२०२१	श्री. लहारे सचिन मोहन	छ.संभाजीनगर	--	छ.संभाजीनगर	मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक,लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग,छत्रपती संभाजीनगर अंतर्गत अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड अंतर्गत कार्यकारी अभियंता, माजलगाव पाटबंधारे विभाग, परळी वै. अंतर्गत पाटबंधारे उपविभाग, तेलगाव येथील रिक्त पदी.
१७	१८/२०२१	श्री.ढेमरे आदेश प्रदीप	छ.संभाजीनगर	--	छ.संभाजीनगर	मुख्य अभियंता (जसं) जलसंपदा विभाग, छत्रपती संभाजीनगर अंतर्गत अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ,परळी वैजनाथ अंतर्गत कार्यकारी अभियंता, माजलगांव कालवा विभाग क्र.७, गंगाखेड अंतर्गत माजलगाव कालवा उपविभाग क्र.३, केसापुरी (वसाहत) माजलगाव येथील रिक्त पदी.
१८	१९/२०२१	श्रीम.रोकडे कोमल रविकांत	कोंकण-२	--	कोंकण-२	मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, मुंबई अंतर्गत प्रकल्प संचालक व अधीक्षक अभियंता, खारभूमी विकास मंडळ, ठाणे अंतर्गत कार्यकारी अभियंता, खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, पेण अंतर्गत खारभूमी विकास उपविभाग, अलिबाग येथील रिक्त पदी.
१९	२०/२०२१	श्री. गणेश तुळशीदास गवळी (दिव्यांग)	पुणे	पुणे	--	मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे अंतर्गत अधीक्षक अभियंता,पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, पुणे अंतर्गत कार्यकारी अभियंता, भामा आसखेड धरण विभाग, पुणे अंतर्गत टेमघर प्रकल्प उपविभाग क्र.१, टेमघर येथील रिक्त पदी.

ANIL VITTHAL DEOKATE

Digitally signed by ANIL VITTHAL DEOKATE
DN: CN = ANIL VITTHAL DEOKATE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = WATER RESOURCES DEPARTMENT
Date: 2025.02.28 17:38:33 +05'30'

(अनिल देवकाते)

उप सचिव, महाराष्ट्र शासन